# विश्वकर्मा विद्यापीठात जागतिक पाणी दिनानिमित्त विशेष स्पर्धा

## डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला प्रथम क्रमांक



**जागतिक पाणी** दिनाचे औचित्य साधून विश्वकर्मा विद्यापीठातर्फे आंतर महाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शाश्वत विकासात पाण्याचे असलेले महत्त्व भावी अभियंत्यांमध्ये रुजावे या हेतूने विश्वकर्मा विद्यापीठातील विलो मॅथर अँड प्लँट इंडिया या जर्मन कंपनीच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या वॉटर क्वालिटी सेंटर अंतर्गत या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेमध्ये तीन विद्यार्थ्यांचा एक संघ असे सात अभियांत्रिकी महाविद्यालयांचे संघ सहभागी झाले होते. प्रत्येक संघाला काही क्यू कार्ड देण्यात आली होती. या कार्डवर शहरातील काही आस्थापनांची चित्रे होती. त्यांचा वापर करून विद्यार्थ्यांनी स्मार्ट सिटीचा एक आराखडा तयार केला आणि जलसंवर्धन हा केंद्रबिंदू ठेवून या आस्थापनांची मांडणी केली.

विद्यार्थ्यांनी हा आराखडा तयार करताना केवळ ढोबळ सादरीकरण न करता एक नाटक तयार करून त्यात शहर अभियंता, स्वयंसेवी संस्थांचा प्रतिनिधी, जलतज्ज्ञ अशा वेगवेगळ्या भूमिका स्वतःच साकारल्या. या नाटकातून त्यांनी प्रत्येक घटकाचे आराखड्याबाबतचे दृष्टिकोन मांडले आणि त्यानुसार आराखड्यास अंतिम स्वरूप दिले. एक प्रकारे प्रत्यक्ष धोरण निर्मितीत जसे वाद-संवाद होतात, तशा वाद-संवादातून विद्यार्थ्यांचे आराखडे तयार झाल्याने त्याला वास्तवाचे रूप आले होते.

या स्पर्धेत डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आकुर्डी या महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला. दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला मिळाले. राजेश उंडे, रवींद्र अक्की, मुकुल पेंडसे आणि सतीश श्रीखंडे या तज्ज्ञांनी स्पर्धेचे परीक्षण केले. मॅथर अँड प्लँट पम्पसचे व्यवस्थापकीय संचालक हेमंत वाटवे, विश्वकर्मा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सिद्धार्थ जबडे, विलो इंडियाचे अंशुमान बडे, विद्यापीठाच्या वॉटर क्वालिटी सेंटरचे संचालक डॉ. धनंजय भातखंडे आणि प्रा. डॉ. श्रद्धा खंपारिया या वेळी उपस्थित होत्या. विश्वकर्मा विद्यापीठाच्या इंजिनिअरिंग विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांनी संयोजन केले.